**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २६ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशभर कारगिल विजय दिनानिमित्त विविध कार्यक्रमातून कारगिल हुतात्म्यांना अभिवादन.**
2. **संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध असल्याचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे प्रतिपादन.**
3. **पुर्व विदर्भात पावसाचा जोर कायम; जनजीवन विस्कळीत.**
4. **फिडे महिला बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम लढत आज; भारताच्या दोन ग्रँडमास्टर्स, कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यात रंगणार लढत.**

---

कारगिल विजय दिवस

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज कारगिल विजय दिनानिमित्त देशासाठी बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना आदरांजली वाहिली.देशाच्या आत्मसन्मानाचं रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या भारत मातेच्या वीर सुपुत्रांचं आपण स्मरण करतो असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कारगिल विजय दिनानिमित्त संदेशात म्हटलं आहे. नागपूरच्या प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगर इथ कारगिल युद्धात थेट सहभागी झालेले निवृत्त ब्रिगेडियर सुनील गावपांडे यांनी आपल्या अनुभवातून युद्धातील प्रसंग विद्यार्थ्यांसमोर कथन केले. कारगिल विजय दिनानिमित्त महाराष्ट्र एअर स्क्वॉड्रन एनसीसी, यांनी एनसीसी ग्रुप मुख्यालय नागपूरच्या वतीने शूर सैनिकांना गार्ड ऑफ ऑनर आणि पुष्पहार अर्पण केले. केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय नागपूर आणि श्री शैक्षणिक आणि सामाजिक बहुद्देशीय संस्था अंतर्गत स्कॉलर्स कॉन्व्हेंट रामदास पेठ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आलेले होते. कार्यक्रमाला इंडियन एअर फोर्सचे एअर वेटरन संदेश सिंगलकर, उपस्थित होते. वर्ध्याचे माजी खासदार रामदास तडस यांनी केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, वर्धा, द्वारे 21 महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत स्थानिक एस.एस.एन.जे महाविद्यालयातील एनसीसी युनिट, प्रहार समाज जागृती संस्था यांच्या वतीने आयोजित कारगिल विजय दिवस समारंभात सहभाग घेतला. केंद्रीय

संचार ब्युरो अमरावती तर्फे श्री गणेशदास राठी विद्यालय इथं कारगिल विजय दिवसाच आयोजन करण्यात आले याप्रसंगी एअर कमोडोर प्रमोद वानखेडे उपस्थित होते.

-------------------------------------

सरन्यायाधीश अमरावती दौरा

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे भारतीय संविधानाचे आणि लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले. दर्यापूर इथल्या न्यायमंदीर, जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर या नूतन न्यायालयीन इमारतीच्या कोनशीलेचे अनावरण सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या काल हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सरन्यायाधीशांनी न्याय व्यवस्थेच्या विकेंद्रीकरणाचे महत्व स्पष्ट केले.

***(होल्ड बाईट -सरन्यायाधीश भूषण गवई 42 सेकंद)***

***हार्दिक अभिनंदन करून इच्छितो कि, आपल्या जिल्ह्यात आपल्या दर्यापूर तालुक्याला, अंजनगाव तालुक्याला मान्यता मिळाली. जिल्हा व सत्र न्यायालयाचं आज आपण उदघाट्न केलेलं आहे. मी नेहमी म्हणत आलेलो आहे कि न्यायचं विकेंद्रीकरण झालं पाहिजे. जस्टीस ऍज डोर स्टेपची जी संकल्पना आहे. ही संकल्पना खऱ्या अर्थानं आपण मान्य केली पाहिजे आणि म्हणून इन्फ्रास्ट्रक्चर कमिटी अध्यक्ष या नात्याने आणि महाराष्ट्रामधील अनेक तालुका इमारतीचं आणि अनेक जिल्हा न्यायालयाचं इमारतीचा प्रस्ताव मंजूर करण्याची संधी मला मिळाली.***

दर्यापूर सत्र न्यायालय कार्यक्षेत्रात दर्यापूर आणि अंजनगाव ही कार्यक्षेत्र येतात. या नूतन इमारतीमध्ये दर्यापूर आणि अंजनगावच्या जिल्हा सत्र न्यायालयाची प्रकरणे (दिवाणी व फौजदारी )या न्यायालयात चालतील. २८.५४ कोटी रुपये निधी खर्चून या सुसज्ज आणि भव्य इमारतीचे बांधकाम करण्यात आले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते अमरावती जिल्हा न्यायालयातील इ लायब्ररीचेही उद्घाटन आज करण्यात आले. गवई यांनी न्यायालयातील इ लायब्ररी कक्षाचे फीत कापून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग रूमची पाहणी आणि संगणकावर ई लायब्ररीची पाहणी केली.

-------------------------------------

संसदरत्न पुरस्कार

प्राइम फाउंडेशनच्या वतीनं लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्यांना त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कामगिरीसाठी दिल्या जाणाऱ्या संसदरत्न पुरस्कार सोहळा राजधानी

दिल्लीत केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत पार पडला. देशातील 17 खासदार आणि दोन संसदीय स्थायी समित्यांना हा पुरस्कार दिला गेला. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचाही समावेश आहे.संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये महाराष्ट्रातील खासदार स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना), नरेश म्हस्के (शिवसेना), अरविंद सावंत (शिवसेना- उबाठा) आणि वर्षा गायकवाड (काँग्रेस) या सात खासदारांचा संसदेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे.

-----------------------------------

डायग्नोस्टिक सेंटर

उत्तर नागपूरच्या कमाल चौक लष्करीबाग येथील स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे लोकार्पण उद्या, २७ जुलै रविवार रोजी होणार आहे. गोरगरीब जनतेला अत्यंत माफक दरात वैद्यकीय तपासण्यांची सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. लष्करीबाग येथील कमाल चौक परिसरात दुपारी १२.३० वाजता हा कार्यक्रम होईल. गडकरी यांच्या संकल्पनेतून आकाराला येत असलेल्या या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, एक्स-रे, सिटी स्कॅन, एमआरआय, डायलिसिस या सुविधा उपलब्ध असणार आहेत.

-----------------------------------

हवामान

पुर्व विदर्भातील गोंदीया, गडचिरोली जिल्हयांमध्ये पावसाचा जोर वाढला असून विविध धरणांमधल्या पाणीसाठ्यात झपाट्यानं वाढ होत आहे. गोंदियाच्या सर्वच तालुक्यात पडत असलेल्या पाऊसामुळे ग्रामीण भागातील अनेक छोट्या नदी नाल्याना पूर आल्याने शेकडो गावांचा तालुका मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. पुजारीटोला, शिरपूर आणी कालीसराळ धरण हे देखिल 60% च्या वर भरले असून धरण पातळी सुनिश्चित ठेवण्यासाठी पाटबंधारे विभागाने धरणाची काही दारे 0.5 मिटरने उघडली आहेत. नदी काठी असलेल्या गावकर्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून गोंदीया जिल्हयातल्या सर्व शाळा आज बंद

ठेवण्यात आल्या आहेत. अमरावती जिल्ह्यामध्ये मागील ४८ तासांपासून संततधार पावसाला सुरुवात झाली असून संपूर्ण जिल्ह्यात पावसाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. परिणामी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गडचिरोलीच्या पर्लकोटा नदीचा पूर ओसरल्याने आलापल्ली-भामरागड मार्गावरील वाहतूक सुरू झाली आहे. मात्र सिरोंचा-असरअली, अहेरी-वट्रा, कुरखेडा-वैरागड, कढोली-उराडी, तळेगाव-चारभट्टी व मालेवाडा-खोब्रामेंढा अशा एकूण दहा मार्गांवरील वाहतूक ठप्प आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुढच्या एका तासात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आणि बुलढाणा, गोंदिया, अकोला, गडचिरोली, वाशीम, अमरावती आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविली आहे. आज सकाळपासूनच नागपूर शहरात पावसाची रिपरिप चालू आहे.

-----------------------------------

फिडे महिला बुद्धिबळ

फिडे महिला बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम लढत आज भारताच्या दोन ग्रँडमास्टर्स, कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यात रंगणार आहे. या स्पर्धेचं जेतेपद आणि उपविजेतेपदही भारताकडे येणार आहे. या स्पर्धेत जिंकणारी बुद्धिबळपटू पुढच्या वर्षीच्या फिडे महिला कँडिडेट्स टूर्नामेंटमध्ये जागतिक अजिंक्यपदासाठी जू वेंजून हिला आव्हान देईल. भारताच्या बुद्धिबळातल्या वाटचालीतला हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

-----------------------------------

क्रिकेट

इंग्लडच्या मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथ सुरु असलेल्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी यजमान इंग्लंडनं भारताविरुद्ध पहिल्या डावात 669 धावा केल्या असून शेवटचे वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या 2 गडी बाद 1 धावा झाल्या होत्या यशस्वी जयस्वाल आणि साई सुदर्शन हे शून्यावर बाद झाले यजमान इंग्लंड संघ 351 धावांनी आघाडीवर होता. इंग्लंडच्या जो रूटने 248 चेंडूत 150 धावा काढत कसोटी क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होण्याचा मन पटकावला आहे. सर्वकालीन कसोटी धावा करणाऱ्यांच्या यादीत त्याने ऑस्ट्रेलियन दिग्गज रिकी पॉन्टिंगनं केलेल्या 13378 धावांच्या विक्रमाला मागे टाकले आहे पण 15921 धावा करणाऱ्या भारताच्या सचिन तेंडुलकरच्या तो मागे आहे. यापूर्वी, भारत पहिल्या डावात 358 धावांवर सर्वबाद झाला होता. सध्या, पाच सामन्यांच्या मालिकेत भारत 1-2 ने पिछाडीवर आहे.

-------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

देशातील तरुणांनी खेळाकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहू नये. तर करिअरच्या दृष्टीने पहावे असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. विदर्भ ऍडव्हेंचर असोसिएशनतर्फे नागपुरात सुरेश भट सभागृहात आयोजित ‘खेळ: एक करिअर’ या सेमिनारमध्ये बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत उपस्थित होत्या. खेळासाठी आवश्यक मूलभूत सुविधा जसे की स्टेडियम, क्रीडा क्लब आणि प्रशिक्षण केंद्रे आधुनिक पद्धतीने सर्वांसाठी सुलभ व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन  नागपुरात  आपण स्वतः पाचतारांकित सुविधांनी सुसज्ज असलेले क्लब आणि स्टेडियम उभारण्याचा मानस बाळगून आहोत असे गडकरींनी सांगितल. या स्टेडियम मध्ये खो-खो, कबड्डी, फुटबॉल, व्हॉलीबॉल यांसारख्या खेळांचे उत्कृष्ट प्रशिक्षण दिले जाईल. या क्लबमधून मिळणारे उत्पन्न इतर नवीन स्टेडियम तयार करण्यासाठी वापरले जाईल, जेणेकरून गरीब आणि दुर्बल वर्गातील मुलेही क्रीडाक्षेत्रात सहभागी होऊ शकतील.

-------------------------------------

जलजीवन मिशन

नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे 10 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अधिकाऱ्यांना दिले. जल जीवन अंतर्गत 1 हजार 302 योजनांची सर्व कामे गुणवत्तापूर्णरित्या करावीत असेही त्यांनी सांगितले. नियोजन भवन इथ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. याप्रसंगी वित्त आणि नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे उपस्थित होते.जिल्ह्यातील पाणी टंचाई कृती आराखडयातील आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली.

-------------------------------------